**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम**

नैसर्गिक परिस्थितीमुळे दुरवरुन पाणी आणावे लागल्याने होणा-या देखभाल, दुरुस्ती खर्चाची काही प्रमाणात प्रतिपूर्ती करण्यासाठी गरजू ग्राम पंचायतींना व जिल्हा परिषदांना **सन २००६-२००७ या आर्थिक वर्षाचे देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान वितरीत करण्याबाबत.**

३५८१३ नाही

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन निर्णय, क्रमांक ग्रापापु-१००६/प्र.क्र.४४४/पापु-०७,**
**मंत्रालय, मुंबई- ४० ०३२, दिनांक : ५ फेब्रुवारी, २००७**

**वाचा:** १) शासन निर्णय, पा.पु.वस्व.वि.,क्रमांक ग्रापापु१००३/प्र.क्र.२५६/पापु-०७, दिनांक १० जुलै, २००६

२) शासन निर्णय, पा.पु.वस्व.वि.,क्रमांक ग्रापापु१००३/प्र.क्र.२५६/पापु-०७, दिनांक १२ ऑक्टोबर, २००६

**शासन निर्णय:**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत नैसर्गिक परिस्थितीमुळे दूरवरुन पाणी आणावे लागल्याने होणाऱ्या देखभाल दुरुस्ती खर्चाची काही प्रमाणात प्रतिपूर्ती करण्यासाठी गरजू ग्राम पंचायतींना व जिल्हा परिषदांना देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान देण्याबाबतचा निर्णय संदर्भिय क्रमांक १ येथील दिनांक १० जुलै, २००६ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आला असून, त्या शासन निर्णया सोबत जोडण्यात आलेल्या **परिशिष्ट- १** व **परिशिष्ट- ३** मध्ये अनुक्रमे स्वतंत्र व प्रादेशिक योजनेस हे देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान प्राप्त होण्यासाठीची पात्रता व त्यांनी पूर्ण करावयाच्या अटी देण्यात आल्या आहेत. त्यामधील अटीनुसार हे अनुदान मागणी करताना लगतच्या वर्षात स्वतंत्र व प्रादेशिक योजनासाठी आकारण्यात आलेल्या एकूण पाणीपट्टीच्या रकमेपैकी किमान ५०% वसूली होणे आवश्यक होते.

२. या संदर्भात सर्व जिल्हयांकडून माहिती मागविली असता असे निदर्शनास आले आहे की, स्वतंत्र व प्रादेशिक योजनांच्या पाणीपट्टीकरीता प्रोत्साहन अनुदान मागणी करताना लगतच्या वर्षात आकारण्यात आलेल्या एकूण पाणीपट्टीच्या रकमेपैकी ५०% एवढी वसूली झालेली नसल्याने बहुतांश स्वतंत्र व प्रादेशिक योजना देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान मिळण्यासाठी पात्र ठरत नाहीत. म्हणून प्रोत्साहन अनुदान प्राप्त होण्यासाठी चालू आर्थिक वर्षाकरीता पाणीपट्टी वसूलीची ५०% ची घालण्यात आलेली अट काही प्रमाणात शिथिल करण्याची विनंती केली होती. त्या विनंतीचा विचार करून संदर्भिय क्रमांक २ येथील दिनांक १२ ऑक्टोबर, २००६ च्या शासन निर्णयान्वये मागील वर्षातील पाणीपट्टी वसूलीची ५०% ची अट शिथिल करुन ती अट ३०% करण्यात आली आहे.

३. जिल्हा परिषदांकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान देण्यासाठी उपलब्ध असलेल्या एकुण निधीपैकी **रु.३६१७.७९ लक्ष प्रादेशिक योजनांना देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान म्हणून व रु.३६१७.७९ लक्ष स्वतंत्र गावच्या योजनांना देखभाल दुरुस्ती अनुदान म्हणून या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रात संबंधित जिल्हा परिषदेच्या नावां समोर दर्शविल्यानुसार पुढील अटी व शर्तींच्या अधिन राहून संबंधित जिल्हा परिषदांना वितरीत करण्यास शासन मंजूरी देत आहे.**

(अ) **स्वतंत्र योजनांसाठी**

(१) देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानासाठी जिल्हयातील पात्र स्वतंत्र योजनांची संख्या व त्या योजनांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान या शासन निर्णया सोबतच्या विवरणपत्रातील रकाना क्रमांक ३ व ४ मध्ये संबंधित जिल्हयाच्या नावांसमोर दर्शविण्यात आले आहे. जिल्हयातील ज्या स्वतंत्र योजनांना प्रोत्साहन अनुदान प्राप्त झाले आहे त्यायोजनांची जिल्हा निहाय यादी सोबत जोडली आहे.

(२) जिल्हयातील स्वतंत्र योजनांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या प्रोत्साहन अनुदानाचे संबंधित योजनांना करावयाचे वाटप संदर्भिय क्रमांक १ येथील दिनांक १० जुलै, २००६ च्या शासन निणर्यातील परिशिष्ट-२ मधील अनुदान वाटपासाठी गावांना वेटेज या शिर्षाखाली देण्यात आलेल्या सुत्रानुसार करण्यात यावे. याप्रमाणे करण्यात आलेल्या प्रोत्साहन अनुदान वाटपाचे आदेशाची प्रत या विभागाकडे पाठविण्यात यावी.

(३) देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानासाठी पात्र स्वतंत्र योजनांमधील गावांनी संदर्भिय क्रमांक १ येथील दिनांक १० जुलै, २००६ च्या परिशिष्ट-१ मधील अटींची व शर्तींची पूर्तता केली आहे याची खात्री जिल्हा परिषदांनी करुन घ्यावी (परिशिष्ट १ मधील अट क्रमांक ६, मागील वर्षात आकारण्यात आलेल्या किमान पाणीपट्टीची वसूलीची अट चालू आर्थिक वर्षाकरिता किमान ३०% करण्यात आलेली आहे. ) व नंतरच प्रोत्साहन अनुदान संबंधित गावांना मुक्त करावे.

(ब) **प्रादेशिक योजना**

(१) देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानासाठी जिल्हयातील पात्र प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची संख्या व त्या योजनांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले प्रोत्साहन अनुदान या शासन निर्णयासोबतच्या विविरणपत्रातील रकाना क्र.५ व ६ मध्ये संबधित जिल्हयाच्या नावांसमोर दर्शविण्यात आले आहे. जिल्हयातील ज्या प्रादेशिक योजनांना प्रोत्साहन अनुदान प्राप्त झाले आहे त्या योजनांची जिल्हानिहाय यादी सोबत जोडली आहे.

(२) जिल्हयातील प्रादेशिक योजनांसाठी प्राप्त झालेले प्रोत्साहन अनुदानापैकी ज्या योजनांची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे. त्या योजनांना शासन निर्णय दिनांक १० जुलै २००६ मधील परिशिष्ट-५ मधील सुत्रानुसार प्रोत्साहन अनुदानाचे वाटप जिल्हा परिषदेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास करावे. या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या विभागास पाठवावा.

(३) जिल्हयातील प्रादेशिक योजनांसाठी प्राप्त झालेल्या अनुदाना पैकी ज्या प्रादेशिक योजनांची देखभाल व दुरुस्ती जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येत आहे. त्या योजनांसाठीचे प्रोत्साहन अनुदान जिल्हा परिषदेस प्राप्त होईल. हे प्रोत्साहन अनुदान जिल्हा परिषदेने संबंधित योजनांवरच खर्च करावे.

(४) दिनांक १० जुलै, २००६ च्या शासन निर्णयातील **परिशिष्ट-३** मध्ये देण्यात आलेल्या अटींपैकी अ..क्र.(१), (३), (४) व (५) मधील अटींची पूर्तता करुन तसा अहवाल या विभागाकडे पाठविण्यात यावा.

४. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदानासाठी राज्यस्तरावर उपलब्ध असलेला निधी या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रात दर्शविल्यानुसार संबंधित जिल्हा परिषदांना मुक्त करण्याची कार्यवाही या विभागाच्या कार्यासन पापु-०४ मार्फत करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सुधाकर ज्ञा. बोबडे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे खाजगी सचिव
२) मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे खाजगी सचिव
३) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
४) विभागीय आयुक्त (सर्व)
५) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई.
६) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
७) जिल्हाधिकारी (सर्व)
८) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद (सर्व)
९) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१०) अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
११) प्रकल्प व्यवस्थापक, सुधारणा सहाय्यक व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, दुसरा मजला, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
१२) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१३) कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१४) उप अभियंता, पाणी पुरवठा उप विभाग,जिल्हा परिषद (सर्व)
१५) उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, (सर्व)
१६) वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, (सर्व)
१७) अवर सचिव, कार्यासन पापु-०४ पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
१८) पाणी पुरवठा व स्वच्छता विभगातील सर्व नियंत्रण व कार्यासन अधिकारी.
१९) संगणक कक्ष
२०) निवडनस्ती (पापु-०७)

### विवरणपत्र

शासन निर्णय, पापुवस्ववि, क्र.ग्रापापु १००६/प्र.क्र.४४४/पापु-०७ दिनांक ५ फेब्रुवारी, २००७ चे सहपत्र

### देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदानाचे जिल्हयांना वाटप

| अ.क्र | जि.प. | प्रादेशिक योजनांसाठी | | स्वतंत्र योजनांसाठी | | एकूण प्राप्त प्रोत्साहन अनुदान (रू.लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रोत्साहन अनुदान प्राप्त योजनांची संख्या | प्राप्त प्रोत्साहन अनुदान (रू.लाखात) | प्रोत्साहन अनुदान प्राप्त योजनांची संख्या | प्राप्त प्रोत्साहन अनुदान (रू.लाखात) | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ठाणे | ७ | १६०.०९ | १६ | ३१.४८ | १९१.५७ |
| २ | रत्नागिरी | ५ | ३५.९१ | ० | ०.०० | ३५.९१ |
| ३ | सिंधुदुर्ग | १ | ९०.२५ | ४२ | ३१.४८ | १२१.७४ |
| ४ | नाशिक | २ | १३९.५२ | ७३ | १७३.६० | ३१३.१२ |
| ५ | धुळे | ९ | २२२.८० | ७० | ८७.७० | ३१०.५० |
| ६ | जळगाव | १२ | २३८.६५ | १७३ | २०९.१३ | ४४७.७८ |
| ७ | अहमदनगर | ३० | ४७४.८० | २४३ | ३५८.४५ | ८३३.२५ |
| ८ | पुणे | १६ | ३०४.९३ | २५० | २९९.५३ | ६०४.४७ |
| ९ | सातारा | ५ | ८०.१० | ८६ | ७२.४१ | १५२.५१ |
| १० | सांगली | ११ | ७०९.२० | ३२३ | ४०७.०२ | १११६.२३ |
| ११ | सोलापूर | ६ | ३१२.०२ | २७७ | ४१४.२२ | ७२६.२४ |
| १२ | कोल्हापूर | ३ | १९७.७२ | २४ | ५३.५२ | २५१.२४ |
| १३ | औरंगाबाद | १० | ८०.२२ | २६५ | २५२.७६ | ३३२.९८ |
| १४ | जालना | ० | ०.०० | ८४ | १२२.३३ | १२२.३३ |
| १५ | परभणी | ० | ०.०० | १२० | १११.५४ | १११.५४ |
| १६ | हिंगोली | ० | ०.०० | २३ | १४.३९ | १४.३९ |
| १७ | उस्मानाबाद | १ | ६४.८९ | १२७ | २४६.०१ | ३१०.९१ |
| १८ | लातूर | ७ | १५७.४१ | ३२९ | १५३.८१ | ३११.२३ |
| १९ | वाशिम | ० | ०.०० | २२ | २४.२९ | २४.२९ |
| २० | अमरावती | ० | ११३.३४ | ८८ | ३३३.७१ | ४४७.०५ |
| २१ | वर्धा | ८ | ९४.९५ | २१ | १८.८९ | ११३.८४ |
| २२ | गोंदिया | २ | ९.१४ | २५ | ४२.२८ | ५१.४२ |
| २३ | चंद्रपूर | १९ | १०६.५८ | ९६ | १५९.२१ | २६५.७९ |
| २४ | गडचिरोली | २ | २५.२८ | ० | ०.०० | २५.२८ |
| एकूण | | १५६ | ३६१७.७९ | २७७७ | ३६१७.७९ | ७२३५.५९ |

(सुधाकर ज्ञा.बोबडे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन ४